Estd.1962
'A++' Accredited by NAAC (2021)
With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात "वंदे मातरम्" या राष्ट्रीय गीताला अद्वितीय स्थान प्राप्त झाले आहे. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी "आनंदमठ" या कादंबरीत हे गीत रचले. हे गीत देशभक्ती, स्वाभिमान व बलिदानाची भावना जागृत करणारे ठरले. "वंदे मातरम्" या घोषणेने असंख्य क्रांतिकारकांना ब्रिटिश सत्तेविरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली. सदर गीताच्या रचनेला दिनांक ७ नोव्हेंबर, २०२५ रोजी १५० वर्षे पूर्ण होत आहेत. या ऐतिहासिक घटनेचे औचित्य साधून राज्यभर "वंदे मातरम् सार्धशताब्दी महोत्सव" विविध उपक्रमांद्वारे साजरा करण्यात येत आहे.

याबाबत शिवाजी विदयापीठ अंतर्गत विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व संगीत अधिविभाग यांचे संयुक्त विद्यमाने शुक्रवार दिनांक ७ नोव्हेंबर, २०२५ रोजी विद्यापीठ मुख्य प्रशासकीय इमारत येथील राजर्षी शाहू सभागृह येथे सकाळी ११ वाजता विद्यापीठातील सन्माननीय पदाधिकारी व मान्यवर यांच्या प्रमुख उपस्थितीत वंदे मातरम या गीताचे सामूहिक गान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

तरी सदर वंदे मातरम या गीताचे सामूहिक गान कार्यक्रमास विद्यापीठातील सर्व शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी, विद्यार्थिनी यांनी उपस्थित राहावे हि विनंती.

कुलसचिव
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

जा.क्र. शिवाजी वि./२६३
दिनांक : ०६/११/२०२५

प्रति,

1. अधिविभाग /प्रशासकीय विभाग प्रमुख यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी व माहितीसाठी
2. स्वीय सहायक – मा. कुलगुरूसो/प्र–कुलगुरू / कुलसचिव / वित्त व लेखाधिकारी / संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांना माहितीसाठी
3. सर्व उपकुलसचिव, सहा. कुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी
4. सर्व रेक्टर यांनी सदरचे परिपत्रक वसतिगृहातील नोटीस बोर्डवर लावणेची व्यवस्था करावी.
5. अभियांत्रिकी व उद्यान विभागाने कार्यक्रमाच्या ठिकाणी कुंडया ठेवण्याची व्यवस्था करावी.
6. जमादार यांनी कार्यक्रमाच्या ठिकाणी आवश्यक टेबल, स्टूल उपलब्ध करून द्यावे व कार्यक्रमाच्या वेळी मदतनीस शिपाई द्यावा.
7. सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी व विद्यार्थीनी यांच्या निदर्शनास आणावे.
8. इंटरनेट विभागाने सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी ठेवावे.